Vol 3 Issue 8 Feb 2014 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-3 | Issue-8 | Feb-2014
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# श्रीशैल मल्लिकार्जुन – एक अभ्यास

एम.एम. मस्के

दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.

***सारांश :-*** आंध्र राज्यात हे स्थान असुन श्रीशैल पर्वतावर याच नावाने असलेल्या ठिकाणी हे स्थान आहे. श्रीशैल पर्वतास श्रीगिरी, श्रीनग व श्रीपर्वत अशीही नावे आहेत. मगध देशाच्या महाराजाची सुंदर सुकुमारी चंद्रावतीच्या भावभक्तिच्या आहारी जाऊन निराकार ईश्वराने साकार रूप धारण करून भक्तिपथ दाखविला.

## *प्रस्तावना :*

सत्–चित्–आनंदरूपी महालिंगाला मल्लिकार्जुन हे नाव देऊन त्या शिवलिंगाचा महिमा जगात पसरविला. अनादि कालापासुन भक्तगणाची इच्छापूर्ती करणाऱ्या ईश्वराचे क्षेत्र म्हणजे हे श्रीशैल होय. छोट्या छोट्या आणि दुर्गम अशा अरण्यात खोलगट भागात हे बसलेले असुन साधारण 1500 फुट उंचीवर हे बसलेले आहे. तेथून दोन मैलांवरून कृष्णा नदी वाहते. त्या क्षेत्रालाच पाताळगंगा असे म्हणतात.

## *पौराणिक माहिती :–*

या ठिकाणी कृतयुगातील हिरण्यकशिपु, त्रेतायुगातील श्री रामचंद्रप्रभु, द्वापरयुगातील पांडव, नारद हे येऊन गेल्याचा उल्लेख सापडतो.

या श्रीशैल्याबद्दल अनेक पौराणिक कथा आहेत. चंद्रावती नावाच्या राजकन्येने बापाच्या स्वभावाला घाबरून या स्थानाचा आश्रय घेतला होता तेथे विपुल असलेल्या जाई व जुईच्या फुलांनी ती शंकराची पुजा करी. जाईला संस्कृतात मल्लिका म्हणतात आणि जुईला अर्जुन म्हणतात. तिच्या या साध्या भक्तिभावाचे प्रतीक म्हणजे मल्लिकार्जुन होय. अर्थात प्रथम तेथे कोणतेही शिवलिंग दृश्य स्वरूपात नव्हते. तिच्या भक्तिने शंकर ज्या ठिकाणी प्रसन्न झाले, त्या ठिकाणी तिने शंकराचे छोटेसे मंदिर बांधले. हि कथा या मंदिराच्या पूर्व आणि दक्षिण भिंतीवर चित्रस्वरूपात आजही कोरलेली आपणाला पाहावयास मिळते. हे मंदिर अत्यंत प्राचीन असुन याचे आवार 660 फुट लांब आहे. व 510 फुट रूंद आहे. 25 ते 26 फुटाचा तट या आवाराभोवती आहे. तटावर कोरीव काम असुन तीन दिशांना तीन प्रवेशद्वारे आहेत. हे मंदिर शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे.

## *ऐतिहासिक माहिती :–*

फाहियान व ह्युएनत्संग या चीनी बौध्द प्रवाशांनी भारताचा प्रवास केला त्यावेळी ते श्रीशैल या ठिकाणी आले होते. अशी नोंद त्यांच्या प्रवास वर्णन या पुस्तकात आहे. श्रीशैल्याच्या परिसरात कदलीवन होते. तेथे असलेल्या स्त्री राज्यात गोरखपंथी मच्छिंद्रनाथाला गौरक्षनाथाने सोडविले व नाथ संप्रदायाची येथेच स्थापना झाली.

तेथील कोरीव लेख चौदाव्या शतकापासुनचे उभारणीत लक्ष घातले होते. हरिहर या विजयनगरच्या राजाने 1405 मध्ये मुख मंडप उभारला. तेथील काही तीर्थकुडे विजयनगराच्या राजांनी बांधलेली आहेत.

नागार्जून, आदिशंकर, बसवेश्वर, गोरखनाथ, ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत हे सुध्दा येथे येऊन गेले आहेत. तेथील शांत व पवित्र वातावरणात राहून काही तेलगु लेखक–कवींनी अनेक ग्रंथ लिहिले आहेत. प्राचीन काळी रसपुट व रसरत्नाकर नावाचा रसायनावर लिहिलेला भारतीय ग्रंथ श्रीशैलाच्या परिसरातील संशोधनावरच आधारलेला आहे. हल्लीच्या मल्लिकार्जुनाच्या मंदिराचे बांधकाम प्राचीन काळी कोणी केले ते जरी उपलब्ध नसले तरि 1404 च्या सुमाराला ते बुध्ददेवराय याने काम केले असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. हल्ली या मंदिराला ज्या नक्षीदार, कमानी, दरवाजे व भव्य स्तंभ असलेला जो मुख मंडप आहे तो बुध्ददेवराय यांच्याच कारकिर्दीतील आहे.

1420 साली पेद्दकोमटी भीमारेड्डी याने बांधलेला दुसरा मंडप अध्यापही तेथे आहे. तेथील तलाव विजयनगरच्या राजानी तयार केला आहे.

तेथील रथमार्ग व त्यावरिल दगडी ओवऱ्या विजयनगरच्या कृष्णदेवराय राजाने कलिंग विजयानंतर बांधल्या आहेत. छत्रपति शिवाजी महाराजसुध्दा तेथे 1667 मध्ये आले होते. त्यांनी बांधलेल्या उत्तरेकडील गोपुराला आजही शिवाजी गोपुर म्हणुनच ओळखतात.

श्री दत्तावतारी, श्री नरसिंह स्वामी सरस्वती यांनी गुरू चरित्रात 43 वा अध्याय श्रीशैल वर्णनाचा लिहिला आहे. आहिल्याबाई होळकर यांनी पाताळगंगेच्या तीरावर 852 पायऱ्या व घाट बांधुन त्याचा जीर्णोध्दार केला होता. श्रीशैल हे लिंगायत धर्मीयांचे एक प्रमुख केंद्र होय. तेथील पाताळगंगेच्या पात्रातील प्रत्येक खडा हा शिवलिंग समजुन तो खडा चांदिच्या अथवा लाकडाच्या टोपणात बंद करून भक्तीने तो गळ्यात घालतात. अलिकडच्या काळात लालबहादुर शास्त्री यांनी तेथील शंकराचे दर्शन घेऊन तेथील जीर्णोध्दारास भारत सरकारची मदत मिळवुन दिली होती. आता आंध्र सरकारने या देवस्थानासाठी कमिटी स्थापना केली आहे. तेथील खास व्यवस्थेसाठी या सरकारने एक खास अधिकारी नेमला आहे. यामुळे रस्ते, पाणी, वीज, बस, वसतिगृह अशा अनेक आवश्यक सोयी व जुन्या वस्तुंच्या दुरूस्तीचे व संरक्षणाचे काम केले जात आहे.

देवालयाच्या भोवताली असलेली किल्याची भिंत विजयनगरच्या कृष्णदेवराय राजाने आपल्याला मिळालेल्या विजयाच्या आठवणीसाठी शके 15 ते 16 व्या शतकामध्ये या किल्ल्याची भिंत बांधवली. 22 फुट उंची असलेल्या या भिंतीचे दगड एकावर एक ठेवलेले आहेत. ते पाहुन आश्चर्य वाटते. भिंतीवरील विष्णु, शंकर यांची चित्रे मन आकर्षित करून घेतात.

### *चंद्रगुप्त महाराजांची मुलगी चंद्रावती :–*

मौर्य वंशीय चंद्रगुप्ताची सुकन्या चंद्रावतीने परमेश्वरच आपला पति व्हावा म्हणुन दृढनिश्चयाने फल–पुष्प–बेल आदिने प्रेमाने शिवलिंगाची पुजा करू लागली. तिची अढळ भक्ती पाहून लिंगातुन उद्‌भवुन तिचे आशारूपी पुष्पाला आपल्या विशाल ह्रदयात स्थान देऊन तिचे भ्रमरांबा नाव ठेवले.

महिषासुर राक्षसाला खाली पाडुन एक पाय राक्षसाच्या देहावर व दुसरा पाय भुमीवर ठेऊन उभी असलेली सिंहवाहीनी मुर्ती पाहताच मन प्रफुल्लित होते. साक्षांत् शिवशक्तिरूपे भ्रमरांबीचे या ठिकाणी वास्तव्य आहे.

### *आजोबा मल्लिकार्जुन स्वामी :–*

श्री मल्लिकार्जुन देवालयाच्या उत्तरेला 30 फुट अंतरावर हे देवालय आहे. अतिशय पिकलेली फळ पक्षांनी टोचुन टोचुन अर्धवट खाऊन टाकावीत त्या प्रमाणे या लिंगाची अवस्था झाली आहे. शिल्पकला जाणत असलेल्या मानवाच्या आगोदरील काळात या लिंगाची उत्पत्ति झाली असावी म्हणुन या लिंगाला आजोबा मल्लिकार्जुन हे नाव प्राप्त झाले असावे. तसेच निराकार परमेश्वराचे साकार रूप म्हणजे हे आजोबा मल्लिकार्जुन होय.

### *श्रीशैल मल्लिकार्जुनांचा नंदिश्वर आणि सहस्त्रलिंग :*

जगाच्या कल्याणासाठी महादेवाने मल्लिकार्जुन या नावाने जन्म घेताच परमेश्वराचे वाहन नंदि यानेसुध्दा बेळ बसवण्णा या नावाने जन्म घेतला. तुझा दास होऊन मोठ्या आनंदाने मी ईश्वरसेवा करिन. म्हणुन मल्लिकार्जुनांच्या अगदी समोर बसुन राहिला आहे.

वनवासात असलेल्या श्रीरामाने आपली मनोव्यथा घालविण्यासाठी सहस्त्र कमलफुले सहस्त्रलिंगे झाली असे म्हणतात. म्हणुनच या लिंगाला सहस्त्रलिंग असे नाव मिळाले. भक्तिभावाने परमेश्वराचे स्मरण केल्यास ज्याच्या त्याच्या भक्तिला अनुसरून ज्यांना–ज्यांना हा परमेश्वर प्रसन्न होतो. तसेच श्रीशैल क्षेत्राच्या अरण्यात धनुर्बाण हातात घेऊन घनदाट जंगलात फिरत असलेल्या चेंचु जातीचे लोकही तेथे आढळतात.

### *हेमरेड्डी मल्लम्मा आणि श्रीशैल क्षेत्रातील घंटामठ :–*

आत्मकुर तालुक्यातील रामपुर या गावात 16 व्या शतकातील पूर्वार्धात नागारेड्डी नावाचा अत्यंत श्रीमंत मनुष्य राहत होता. तो विनयशील, परोपकारी व शांत स्वभावाचा होता. त्यांची पत्नी गौरम्मा हि पती हाच परमेश्वर मानुन सदेव पतिसेवेतच लीन राहत असे. अत्यंत ऐश्वर्यात आणि आनंदात असताना त्यांच्या मनाला संततीचा प्रश्न सताक लागला. तेंव्हा पती–पत्नीनी कुलदैवत असलेल्या श्रीशैल मल्लिकार्जुनाला जाऊन देवालयातच काही काळ राहुन परमेश्वराची खुप सेवा केली. पण निराशाच त्यांच्या पदरी आले. आपल्या गावी परत जावे असा विचार करून पती–पत्नी निद्रावश झाली. त्याच रात्री नागारेड्डीला स्वप्न पडले " हे नागारेड्डी ! भ्रमरांबा देवी तुझ्या पोटी जन्म घेणार असुन पतिव्रत्याच्या गुणामुळे सासर व माहेर या दोन्ही घराण्यांचा उध्दार करणार आहे." या शुभ स्वप्नाच्या समाचार पत्नीला सांगितले अत्यंत आनंदाने दोघे आपल्या गावी निघुन गेले. स्वप्नाप्रमाणे काही दिवसातच त्यांच्या पत्नीला गर्भधारणा होऊन पुढे काही दिवसातच एक सुंदर कन्यारत्न झाले. तिचेच नाव मल्लम्मा.

पुढे मोठी झाल्यावर मल्लमाने भक्ति भावाने पतिसेवा, मल्लिकार्जुन सेवा आणि लिंग–जंगमाची सेवा करून मोक्ष मिळविले. क्रिस्तिशतकाच्या सुरूवातीला सिध्देश्वर नावाच्या तपस्याने तपश्चर्या करित असता सुप्तावस्थेत जागृत अवस्थेत प्राप्त व्हावी म्हणुन आणि सुचना कळण्यासाठी एक मोठा घंटा बांधला होता म्हणे याच मठाला घंटामठ असे म्हणतात. या प्रदेशातील डोंगर दऱ्यात दाट झाडी वाढलेली असुन सृष्टी सौंदर्य नयन मनोहर आहे. तेथील अरण्यात वेलींच्या मुळातुन दुधासारखे पांढरे शुभ्र थेंब झिरपुन वाहणाऱ्या प्रवाहाला पालाधार किंवा पंचधार असे म्हणतात.

***श्रीशैल क्षेत्रातील सिध्दरामेश्वर नेत्रतलाव व अन्य दर्शनीय स्थळे :–***

प्रत्यक्ष परमेश्वराला पाहण्याची इच्छापूर्ती करून घेण्यासाठी सिध्दारामाने तपश्चर्या आरंभिली. तपश्चर्येने प्रसन्न झालेल्या परमेश्वराने दर्शन दिले. प्रत्यक्ष परमेश्वराच्या दर्शनाने सिध्दारामाला अत्यानंद झाला. व त्यांच्या डोळ्यातुन आनंदाश्रु वाहु लागले. त्यालाच सिध्दारामेश्वर नेत्रतलाव असे नाव मिळाले. या तलावात स्नान केल्यास मनुष्याच्या पापाचे क्षालन होते. भ्रमरांबा, भिननकोळ्ळ अशी अनेक दर्शनीय स्थळे श्रीशैल्याच्या परिसरात पसरलेली आहेत.

***भ्रमरांबा :–***

महिषासुराशी युध्द करतेवेळी दुर्गादेवीने ज्यात भृगे आहेत अशा कमळाची बनविलेली माळ घातली होती. म्हणुन तिला भ्रमरांबा असे म्हणतात. या पर्वतावर तिने वास्तव्य केलेले आहे. देवीचे हे मंदिर मल्लिकार्जुन मंदिराच्या मागील बाजुस उंचावर आहे. त्यासाठी 50 ते 60 पायऱ्या चादुन जावे लागते. मंदिराभोवती तट आहे. श्री शंकराचार्य या देवाच्या दर्शनास आल्यावर त्यांनी तिच्या स्तुतीचा केलेला भ्रमरांबअष्टक प्रसिध्द आहे.

***भिमनकोळ्ळ :–***

हे स्थळ मुख्य मंदिरापासुन साधारण एका दरित आहे. पांडव वनवासात हिंडत असता या परिसरात आले होते. त्यावेळी भिमाला खूप तहान लागली होती पण जवळपास त्याला कुठेपाणी मिळाले नाही. म्हणुन त्याने एके ठिकाणी जोरात गदा जमिनदार हाणीली. आणि त्या प्रहाराने जमिनीतुन पाणी उफाळुन वर आले. भीमाची तहान भागली. म्हणुन त्याला भीमनकोळ्ळ असे म्हणतात.

***यात्रा व प्रवासमार्ग :–***

श्रीशैल येथे यात्रा आठवडा भर असते. सोलापुरहुन हजारो कावाड व नंदिध्वज माघ, फाल्गुन महिन्यात महाशिवरात्रीच्या दिवशी चालत निघतात. या चालत जाण्याच्या परंपरेमागे एक मौकिक इतिहास आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी हजर असतात. गुढीपाडव्याच्या दिवशी महापुजेचे मान फक्त सोलापूर करांचाच असतो. तसेच त्या दिवशी मल्लिकार्जुनांचे स्पर्शदर्शनही फक्त सोलापूरकरांनाच मिळते.

या तीर्थक्षेत्री जाण्यास दोन प्रकारे मार्ग उपलब्ध आहेत. एक सोलापूरहुन पहाटे 5वा. सोलापुर ते श्रीशैलम् एस.टी.बस सेवा उपलब्ध आहे. तर दुसरे मार्ग रेल्वेने कर्नुल स्टेशनला उतरून पुढे श्रीशैलला बसने जावे लागते. श्रीशैल येथे गेल्यावर जंगम लोकांसाठी जंगमस्थळ आहे. सिध्देश्वर धर्मशाळा आहे. तसेच अन्नक्षेत्रही आहे. आणि नाममात्र फि घेऊन धर्मशाळेतच राहण्याची सोयही केली जाते.

***निष्कर्ष :–***

अशा प्रकारे श्रीशैल मल्लिकार्जुन यांचे महात्म्य समजते. त्यांच्या वास्तव्याने श्रीशैल या स्थानाला तीर्थक्षेत्र म्हणुन महत्व प्राप्त झाले आहे. आजही मल्लिकार्जुनांचे समस्त भक्तगणांवर कृपादृष्टी आहे. मला असे वाटते की, या तीर्थक्षेत्री आणखीन उत्खनन केल्यास आणखीन काही पुरावे मिळू शकतात.

***संदर्भ :–***

1. सोलापूर जिल्हा गॅझेटीसर, महाराष्ट्र शासन , 1977 गोपाळशन देशमुखन
2. सोलापूर जिल्ह्याचा इतिहास, पंढरपूर.
3. मा.श्री. माटे – प्राचीन भारतीय कला, कॉंटीनेंटल प्रकाशन पुणे
4. डॉ. माया पाटील – पुरातत्त्व एक पर्दालोचन, सुविधा प्रकाशन, सोलापूर
5. श्रीशैल महात्म्य – डॉ. शे.दे. पसारकर , सोलापूर.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net